जिल्हा परिषदांतर्गत कार्यरत असलेल्या ग्रामीण पाणी पुरवठा विभाग/ उप विभागातील पदांचा आढावा घेण्यासाठी समिती गठीत करण्याबाबत

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
शासन निर्णय क्रमांक : ग्रापापु १००१/प्र.क्र.४२८/पा.पु.०७
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक : ४ नोव्हेंबर, २००६

वाचा : १) शासन निर्णय वित्त विभाग क्र.असंक १००१/प्र.क्र.२९/२००१/वित्तीय सुधारणा दिनांक १० सप्टेंबर २००१
२) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र.ग्रापापु १००१/प्र.क्र.४२८/ पापु ०७, दिनांक ९ एप्रिल, २००३

शासन निर्णय :

प्रत्येक विभागाच्या नियंत्रणाखाली विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख यांच्या कार्यालयात अस्तित्वात असलेल्या सर्व पदांचा, राबवित असलेल्या योजनांचा व कार्यक्रमांचा आढावा घेऊन उच्चस्तरीय समिती समोर अहवाल सादर करण्याचे आदेश संदर्भिय क्र. १ येथील शासन निर्णयान्वये देण्यात आलेले आहेत. त्या अनुषंगाने जिल्हा परिषदांमधील ग्रामीण पाणी पुरवठा विभागातील पदांचा आढावा घेऊन उच्चस्तरीय समिती समोर अहवाल सादर करण्यासाठी संदर्भीय क्र.२ येथील शासन निर्णयान्वये या विभागात समिती गठीत करण्यात आली होती. परंतु, सदर समितीमधील अधिका-यांच्या बदल्या झाल्यामुळे सदर समितीला आपला अंतिम अहवाल सादर करता आला नाही.

२. जिल्हा परिषदांमधील ग्रामीण पाणी पुरवठा विभाग/ उप विभागातील पदांचा आढावा घेऊन त्याबाबतचा अहवाल उच्च स्तरीय समिती समोर सादर करणे आवश्यक असल्याने संदर्भिय क्र.२ येथील शासन निर्णयान्वये गठीत करण्यात आलेल्या समितीचे पुढीलप्रमाणे पुनर्गठण करण्यास शासन मंजूरी देत आहे:-

| | |
|---|---|
| १) श्री.संजीव कुमार, सह सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग | अध्यक्ष |
| २) श्री.ना.रा.शेरे, उप सचिव,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग | सदस्य |
| ३) श्री.एस्.पी.बागडे, संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे | सदस्य |
| ४) श्री. भातखंडे, मुख्य प्रशासन अधिकारी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,मुंबई | सदस्य |
| ५) श्री. एन्.डी.पुरणकर, सह संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा,पुणे | सदस्य |
| ६) श्रीमती जयलक्ष्मी चेक्कला, संस्थीय व समाज विकास तज्ञ, आर.एस.पी.एम.यु. | सदस्य |
| ७) कक्ष अधिकारी, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग (पापु ०७) | सदस्य सचिव |

३. संदर्भीय क्र.२ येथील शासन निर्णयात देण्यात आलेल्या बाबींचा विचार करुन सदर समितीने जिल्हा परिषदांमधील ग्रामीण पाणी पुरवठा विभाग/ उप विभागातील पदांचा आढावा घेऊन त्याबाबतचा अहवाल शासनास एका महिन्यात सादर करावा.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २००६११०४१०३७४५००१ असा आहे

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( सुधाकर ज्ञा.बोबडे )
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) श्री.संजीव कुमार, सह सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
२) श्री.ना.रा.शेरे, उप सचिव,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
३) श्री.एस्.पी.बागडे, संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
४) श्री. भातखंडे, मुख्य प्रशासन अधिकारी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,मुंबई
५) श्री. एन्.डी.पुरणकर, सह संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा,पुणे
६) श्रीमती जयलक्ष्मी चेक्कला, संस्थीय व समाज विकास तज्ञ
७) संगणक कक्ष, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
८) निवड नस्ती, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग (पा.पु.०७)